# के. के. वाघतर्फे १८ मार्चला टेडेक्स

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेच्या वतीने बुधवारी (दि.१८) गुरुदक्षिणा सभागृह येथे 'टेडेक्स २०२६' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षीचा कार्यक्रम संकल्प - द फेम ऑफ रिझोल्युशन या संकल्पनेवर आधारित आहे. याप्रसंगी भरत चांडक (युवा गायक), आशिष भारतवंशी (आध्यात्मिक विचारवंत), योगेंद्र सिंह यादव (परमवीर चक्र पुरस्कार विजेते), अविनाश धर्माधिकारी (माजी आयएएस अधिकारी), कोमल सोमानी (उद्योजिका), अंकिता मेहरा (युवा वक्त्या) व्याखयान सादर करणार आहेत. या कार्यक्रमात अवधूत गांधी यांचे सांस्कृतिक सादरीकरण, भरत चांडक यांचे संगीत सादरीकरण, कॉलेज बँड, नृत्य सादरीकरण यांचा समावेश असल्याची माहिती प्रा. डॉ. रवींद्र मुंजे यांनी दिली. तिकीट बुकिंग www.tedxkkwieer.com या संकेतस्थळावर सुरू झाले आहे. संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, जनसंपर्क संचालक अजिंक्य बाळासाहेब वाघ व सचिव प्रा. के. एस. बंदी व प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर यांनी सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.